# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २३ मार्च, २०१८ / चैत्र २, १९४० (शके)**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६०**

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील (नागपूर) सर्व विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका योजनेचा लाभ देण्याबाबत

**(१) * ३९१२७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये कमवा आणि शिका योजनेंतर्गत १९५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले असतानाही निम्म्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा व नागपूर जिल्हयातील पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या व आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या बहुतांश विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कमवा आणि शिका योजनेंतर्गत १९५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. पहिल्या टप्प्यात ऑक्टोबर, २०१७ पर्यंत १९५ पैकी १०२ विद्यार्थ्यांना तर दुसऱ्या टप्प्यात २ डिसेंबर, २०१७ पर्यंत उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुदानित शाळांमधील अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांवरील शिक्षकांना अनुदान मंजुर करण्याबाबत

**(२) * ३७९८२ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मान्यता प्राप्त अनुदानित शाळांमधील अतिरिक्त अथवा नैसर्गिक वाढीच्या तुकडयांवरील शिक्षकांना अनुदान मंजुर करणेबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील अनुदान पात्र असलेल्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्यांचे मंजुरीचे किती प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत व त्यापैकी ज्या शाळांमधील नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्यांचे ऑनलाईन मुल्यांकन होऊ शकले नाही अशा अतिरिक्त तुकड्यांचे ऑफलाईन मुल्यांकन करुन अनुदान मंजुरीबाबतचे किती प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले आहेत,

(३) असल्यास, दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णयाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये अनुदानित शाळेत अतिरिक्त अथवा नैसर्गिक वाढीच्या ५९७३ तुकडयांना मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शासन निर्णयाप्रमाणे ४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पाचव्या वर्षी मुल्यांकन करुन शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये २० टक्के टप्पा अनुदान करण्याचे निश्चित करण्यात येऊनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने ८९६० शिक्षक गेली ६ वर्षे विनावेतन ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे करित असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, नागपूर विभागातील जिल्हावार किती प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी विचाराधीन आहेत व सदर प्रस्ताव शासनाकडुन कधीपर्यंत निकाली काढणार आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानित शाळांमधील अतिरिक्त अथवा नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांवरील शिक्षकांना अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून ५३३ प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वर्ग तुकडयांचे प्रस्ताव अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी शासनास प्राप्त झाले आहेत.

(३) होय.

(४) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४ (३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.

(५) व (६) नागपूर विभागातील नागपूर-९, गोंदिया-३, गडचिरोली-२ व चंद्रपूर-५ अशा एकूण १९ प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वर्ग/तुकडयांचे प्रस्ताव शासनाकडे अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी प्राप्त झालेले आहेत. त्यावर आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील प्राध्यापकांची रिक्त पदे भरुन इमारत दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत

**(३) * ३८७१७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३७७ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील प्राध्यापकांच्या मंजूर असलेल्या १३९ पदांपैकी ६१ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अभियांत्रिकी महाविद्यालयाची मुख्य इमारत व कार्यशाळा इमारतीचे छत खराब झाले असल्याने पावसाळयात सदर छत गळत असून सदर संस्थेत २००० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी रुपये १ कोटी ४० लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयातील रिक्त पदे भरुन इमारत दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेच्या छत दुरुस्तीच्या बांधकामासाठी रुपये १४७.३९ लक्ष रकमेचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश दिनांक ०३/०१/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) राज्यातील स्वायत्त व अस्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या बिंदूनामावल्या प्रमाणित करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून तद्नंतर रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्रे सादर करण्यात येतील.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेतील छत दुरुस्तीच्या कामासाठी विधीमंडळाच्या सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पूरक मागणीद्वारे रुपये १४७.३९ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली असून ती ८०% च्या मर्यादेत वित्त विभागाच्या सहमतीने वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थापन केलेल्या वसाहतीमध्ये स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याबाबत

**(४) * ३८९०१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक विकास महामंडळामधील निम्मे रासायनिक/दुषित पाणी प्रक्रिया प्लँट केंद्र शासनाच्या सन २०१६ च्या नियमानुसार अंमलबजावणी करीत नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशतः खरे आहे.
(अ) राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थापन केलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक व इतर उद्योगांनी स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारलेल्या आहेत.

(ब) तसेच सदर औद्यागिक वसाहतीमध्ये सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी एकूण २८ औद्योगिक वसाहतीमध्ये सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात आल्या आहेत.

(क) राज्यातील सागर तटीय क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या सामुहिक सांडपाणी प्रक्रियेचे प्रक्रिया केलेले सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केलेल्या ठिकाणी समुद्रात सोडण्यात येते.

(ड) मंडळाने सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रांना ऑनलाईन मॉनिटरींग यंत्रण (स्काडा) बसविण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(ई) सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयत्रणांचे सांडपाण्याचे नमूने विहित मर्यादेत आढळून आले नसल्यामुळे अशा यंत्रणांना मंडळाने अल्प व दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करण्यासंदर्भातले निर्देश दिलेले आहेत.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दोषी आढळणाऱ्या रासायनिक कारखान्यांवर खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(५) * ३८२२९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरातील नागरिकांना पिण्याच्या शुध्द पाण्याचा पुरवठा होत असलेल्या नवीन सुधारित पाणीपुरवठा योजना जॅकवेलची इमारत ठिसूळ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जॅकवेल इमारतीची सर्व कामे पुन्हा योग्यरितीने करुन आवश्यक ती डागडुगीची कामे प्राधिकरणाने करणे आवश्यक आहे, यासंदर्भात अनेकवेळा पत्रव्यवहार करुनही प्राधिकरण त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने उक्त पाणीपुरवठा योजना केव्हाही बंद पडू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंढरपूर शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. जॅकवेलची इमारत खचलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) दैनंदिन पाणीपुरवठा चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनुदानास पात्र म्हणून घोषित केलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या वर्ग तुकड्यांना अनुदान देण्याबाबत

**(६) * ३७९०१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ३५५३९ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उच्च माध्यमिक शाळांना कायम शब्द लावण्याच्या अगोदर काही उच्च माध्यमिक वर्ग तुकड्यांना विनाअनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आली असून या तुकड्यांपैकी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी शालेय शिक्षण विभागाच्या शासन आदेशाने उच्च माध्यमिकच्या २ वर्ग तुकड्या ४० टक्के व १२ वर्ग तुकड्या १०० टक्के अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००१ पूर्वीपासून कायम विनाअनुदान तत्वावर सुरु असणाऱ्या महाविद्यालयात वर्ग तुकड्यांवर विद्यार्थी संख्या असून मागील १७ वर्षापासून हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन काम करीत आहेत

तसेच सदर वर्ग तुकड्यांना अनुदान मिळण्यासाठी विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास निवेदन प्राप्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वर्ग तुकड्यांना अनुदान देण्याबाबत शासन सकारात्मक असून लवकरच अनुदान दिले जाईल असे लोकप्रतिनिधींना शासनाने आश्वासित केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २००१ पासून किती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी राज्यात विना वेतनावर काम करीत आहेत, तसेच त्यांना केव्हापर्यंत वेतन लागू करण्यात येणार आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शासन आदेशानुसार सन २००१ पूर्वीपासून सुरु असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना तसेच अनुदानास पात्र असलेल्या वर्ग तुकड्यांना चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनुदानाची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) सदर वर्ग तुकडयांना अनुदान मिळण्यासाठी विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४(३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.
(३) होय.
(४) व (५) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४(३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदार संबंधित संस्थेची आहे. तथापि, सदर १४ वर्ग तुकड्यांना अनुदान मंजूर करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेत अपंग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत शिपाई पदांसाठी उमेदवारांची बेकायदा भरती केल्याबाबत

**(७) * ३८५८७ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालघर जिल्ह्यातील प्रतिक्षा यादीतील रिक्त असलेली २११ पदे भरण्यासाठी शिक्षण उपसंचालक (प्राथमिक), पुणे यांना माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्र पाठवले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्हा परिषदेत सन २००९ मध्ये अपंग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत ८० शिपाई पदांवर बेकायदा भरती करण्यात येऊन त्यामध्ये कथित गैरव्यवहार झाल्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग), विभागीय आयुक्त (कोकण विभाग) व जिल्हाधिकारी (पालघर) यांच्याकडे दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास समर्थन संस्थेने लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर व उपसंचालक (शालेय शिक्षण), पुणे यांनी आर्थिक व्यवहार करून रिक्त पदे मंजूर करून त्यामध्ये कथित गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भरतीप्रक्रियेत शासकीय नोकरीत रुजू होताना वयाची १८ वर्षे पूर्ण असावीत असा नियम असतानाही उक्त नियमाचे उल्लंघन करून १८ वयापेक्षा कमी वयाच्या उमेदवारांची भरती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय. जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक १५ जुलै, २०१७ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद पालघर अंतर्गत रिक्त असलेल्या पदांवर अपंग एकात्मिक योजनेतील परिचरांना समायोजीत करण्याबाबत शिक्षण उपसंचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आले होते.

(२) होय. समर्थन संस्थेने दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन देऊन त्याची प्रत मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, मुख्य सचिव इ. यांच्याकडे देण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) नाही. जिल्हा परिषदेंतर्गत थेट भरती करण्यात आली नाही तर अपंग एकात्मिक योजनेतील कार्यरत असलेल्या परिचरांचे समायोजन करण्यात आले आहे.

(५) होय. जिल्हा परिषद, पालघर येथील समायोजनासंदर्भात शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती जिल्हा परिषदेस प्राप्त पत्रे ही बनावट व खोटी असल्याने सदर पत्राच्या आधारे समायोजीत करण्यात आलेल्या सर्व ८० परिचरांची सेवा दिनांक ०७/०२/२०१८ च्या आदेशान्वये समाप्त करण्यात आली आहे. तसेच संबंधित परिचरांच्या बँक खात्यावरील व्यवहार पुढील निर्देशापर्यंत स्थगित ठेवण्याबाबत व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र यांना कळविले आहे. संबंधित दोषींवर दिनांक २७/०२/२०१८ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाने निदेशित केल्याप्रमाणे विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांच्यास्तरावर जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी केली असून त्यात श्री.प्रकाश देवरुषी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.पी.बी. कडू, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व श्री.आर.डी. पवार, वरिष्ठ सहाय्यक यांना सकृत दर्शनी जबाबदार धरण्यात आले असून त्यांच्याविरुध्द नियमाप्रमाणे विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील धान्य घोटाळयाची चौकशी करण्याबाबत

**(८) * ३८४८० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील महसूल विभागातील १६ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगनमत करून २८ कोटी रूपयांचा धान्य गैरव्यवहार केल्याप्रकरणी उपायुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ३-उपजिल्हाधिकारी, १०-तहसिलदार व ३-नायब तहसिलदार यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश जाहीर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य घोटाळयास जबाबदार असणाऱ्या अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय, उक्त गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, पदनाम व त्याची थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने विभागीय चौकशी पूर्ण करून संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) अंशत: खरे आहे

पुरवठा संचालनालय, मुंबई पथकाने परभणी येथील शासकीय धान्य गोदामाची तपासणी केला असता एकूण रुपये ४,९७,६९,९२९/- रकमेचा धान्य गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून एकूण २० अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.संतोष वेणीकर | जिल्हा पुरवठा अधिकारी |
| २ | श्री.लक्ष्मण मुंजाळ | तहसिलदार |
| ३ | श्री.लक्ष्मण धस | नायब तहसिलदार |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्रीम. चित्रा देशमुख | नायब तहसिलदार |
| ५ | श्री.एम.जी.मिसाळ | नायब तहसिलदार |
| ६ | श्री.आसाराम छडीदार | तहसिलदार |
| ७ | श्री.मिलिंद गायकवाड | नायब तहसिलदार |
| ८ | श्री.पांडुरंग माचेवाड | तहसिलदार |
| ९ | श्री.महादेव सुरवसे | नायब तहसिलदार |
| १० | श्री.जिवराज डापकर | तहसिलदार |
| ११ | श्री.अविनाश शिंगटे | तहसिलदार |
| १२ | श्री.जी.डी.वळवी | तहसिलदार |
| १३ | श्री.देवीदास गाढे | तहसिलदार |
| १४ | श्री.सुभाष नामदेव शिंदे | उपजिल्हाधिकारी |
| १५ | श्री.रामेश्वर रोडगे | उपजिल्हाधिकारी |
| १६ | श्री.राहुल गायकवाड | तहसिलदार |
| १७ | श्री.दिलीप कच्छवे | जिल्हा पुरवठा अधिकारी |
| १८ | श्री.संतोष रुईकर | तहसिलदार |
| १९ | श्री.सि.बी.पांचाळ | नायब तहसिलदार |
| २० | श्री.अनिल आंबेराव | गोदामपाल |

(३) उक्त अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्रस्तावाची छाननी सुरु असून छाननीनुसार अधिकची माहिती मागविण्यात आली आहे. चौकशीअंती दोषी अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील उर्दू माध्यमांच्या शिक्षकांची पद भरती करण्याबाबत

**(९) * ३७८५३ श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०१० ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यमांच्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे दीड महिन्यात नवीन प्रक्रियेद्वारे भरण्यात येतील असे आश्वासन मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी विधान परिषदेत दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यमांच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि प्राथमिक शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील खाजगीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व माध्यमाच्या शाळांमधील शिक्षण सेवक भरती ही अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे करण्याकरिता माहे डिसेंबर, २०१७ मध्ये सदर परीक्षा घेण्यात आलेली आहे. “पवित्र” या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सदर भरती प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(१०) * ३८२८५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील अल्पसंख्यांक घटकातील ५५९४ विद्यार्थ्यांना मागील ८ वर्षापासून सन २०१० ते २०१७ या कालावधीतील शिष्यवृत्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

यवतमाळ जिल्हयातील सन २००९-१० ते सन २०१६-१७ पर्यंतच्या कालावधीतील जे अल्पसंख्यांक विद्यार्थी प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीस पात्र झाले, परंतु चुकीच्या व अपुऱ्या बँक खात्याच्या माहितीमुळे अशा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती जमा होऊ शकली नाही. सदर विद्यार्थ्यांपैकी सन २०१४-१५ पर्यंतच्या कालावधीतील ५५५३ विद्यार्थ्यांची माहिती सरल डाटाबेस मधून उपलब्ध झालेली आहे. सदर विद्यार्थ्यांची तसेच सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीतील विद्यार्थ्यांची सुध्दा बँक खात्याची आवश्यक व अचूक माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर माहिती प्राप्त होताच विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती जमा करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षकांच्या पाल्यांना उच्च शिक्षणाच्या शुल्काचा परतावा मिळण्याबाबत

**(११) * ३८९५१ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या

शुल्कानुसार शिक्षण विभागाकडून केली जात नसून शिक्षकांच्या पाल्यांना शिक्षणाच्या शुल्काचा परतावा देण्याची योजना बंद पडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना बंद पडण्याची कारणे काय आहेत तसेच या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तरतूद शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शुल्काची प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.
(२) व (३) सद्यःस्थितीत सदर योजनेची अमंलबजावणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले विदयापीठ, पुणे यांच्या "मास्टर प्लॅन" ला मान्यता देण्याबाबत

**(१२) * ३७८४९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांनी विद्यापीठ परिसराचा पुढील तीस वर्षाचा “मास्टर प्लॅन" तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर “मास्टर प्लॅन" मध्ये कोणकोणत्या प्रमुख बाबींचा समावेश करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त “मास्टर प्लॅनचे" सर्वसाधारण स्वरुप काय आहे, त्यावर केव्हापासून अंमलबजावणी होणार आहे व त्याकरिता किती खर्चाची तरतुद करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर मास्टर प्लॅनमध्ये खालील बाबींचा समोवश करण्यात आला आहे :-

१. विद्यापीठाच्या संपूर्ण जागेचे झोनिंग करण्यात आले असून यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक विभाग, प्रशासकीय विभाग, निवासी झोन, सुविधा झोन, खेळाचे मैदान/संकुल, गार्डन्स, पार्किंग इ. मध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

२. विद्यापीठ चौकात होणारी वाहतुक कोंडी व विद्यापीठ चौकात येऊ घातलेले मेट्रो स्टेशन यांचा प्रामुख्याने विचार करुन विद्यापीठाचे प्रवेशद्वार औंध रस्त्यावरील गोल मार्केट समोर स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

३. विद्यापीठ परिसरात वाहनांची वर्दळ व प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून सायकल ट्रॅक व पादचारी मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे.

४. विद्यार्थ्यांकरीता २७ एकरांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठाच्या एकूण ४११ एकर एवढ्या क्षेत्रफळापैकी ४०% एवढे क्षेत्रफळ हे मोकळी जागा व ग्रीन झोन म्हणून राखीव ठेवण्यात आलेले आहे.

(३) सदर मास्टर प्लॅन हा विद्यापीठाच्या भविष्याचा वेध घेऊन करावा लागणारा भौतिक विकास लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या आवारातील भौतिक विकास हा नियोजनबध्द होणार असून त्यामुळे विद्यापीठाचा परिसर हा स्मार्ट युनिव्हर्सिटी परिसर म्हणून विकसित करण्यास मदत होणार आहे.

-----------------

## शालेय शुल्क नियमन कायद्यात सुधारणा करण्याबाबत

**(१३) * ३८११८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण शुल्कवाढी विरोधात शुल्क नियमन कायद्यामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात शिफारशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश व्ही.जी.पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या समितीने आपला अहवाल दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अहवालातील शिफारशींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) अहवालातील शिफारशींवर संबंधित घटकांबरोबर चर्चा करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विभागीय शुल्क नियामक समितीत नियमांचे उल्लंघन करुन एका प्रतिष्ठित व्यक्तीस नियुक्त केल्याबाबत

**(१४) * ३८८०२ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ च्या कलम ७ अंतर्गत मुंबई विभागीय शुल्क नियामक समिती गठीत झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलम ७(२)(d) मधील सेवानिवृत्त सहसंचालक अथवा त्यावरील कोणत्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली,

(३) असल्यास, सदर नियुक्ती करताना अधिनियमातील कलम ८(६)(g) चे उल्लंघन करुन एका प्रतिष्ठित संस्थेच्या आस्थापनेवर कार्यरत व्यक्तीस नियुक्त केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावाची योग्य पडताळणी करण्याची जबाबदारी पार पाडण्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम ७(२)(d) मधील तरतुदीनूसार मुंबई येथील विभागीय शुल्क नियामक समितीवर श्री.मोहन आवटे, सेवानिवृत्त शिक्षण संचालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यात पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्‌यालय सुरु करण्याबाबत

**(१५) * ३९२१८ श्री.बाळाराम पाटील, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात व आसपासच्या परिसरात विद्‌यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे याकरिता कोणत्याही सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने विद्‌यार्थ्यांना ठाणे किंवा नाशिक या शहरामध्ये जाऊन उच्च शिक्षण घ्यावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिदुर्गम व आदिवासी भागातील विद्‌यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्याच्यादृष्टीने सदर भागामध्ये शासकीय तंत्रनिकेतन, वैद्‌यकीय व शासकीय इतर तत्सम कोर्स / अथवा महाविद्‌यालये सुरु करण्याबाबत तसेच शासकीय शिक्षणाच्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर तालुक्यात पारंपारिक अभ्यासक्रमाचे महाविद्यालय सुरु आहे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी मुंबई विद्यापीठाच्या बृहत आराखडयामध्ये सदरहू तालुक्यामध्ये एका महाविद्यालयासाठी एक बिंदू निश्चित करण्यात आला आहे. तथापि, या बिंदूसाठी कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

शासनाच्या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक तंत्रनिकेतन महाविद्यालय धोरणानुसार पालघर जिल्ह्यातील विक्रमगड येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाची स्थापना केलेली आहे.

तसेच, पालघर जिल्ह्यात एक वैद्यकीय महाविद्यालय सुरु असून त्यामध्ये एम.बी.बी.एस. प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) नाही.

सद्य:स्थितीत सदर तालुक्यामध्ये शासकीय तंत्रनिकेतन अथवा महाविद्यालये सुरु करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. तथापि, पालघर जिल्ह्यामध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणारी महाविद्यालये आहेत. तसेच, व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सामायिक प्रवेश परीक्षेमार्फत केंद्रीभूत प्रक्रियेद्वारे करण्यात येत असल्याने एखाद्या विशिष्ट भागातील विद्यार्थ्यास त्याच भागात प्रवेश मिळेल असे नाही.

तसेच, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या जागा प्रवेशाविना मोठ्या प्रमाणावर रिक्त राहत असल्यामुळे नवीन महाविद्यालये सुरु करण्याची आवश्यकता नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागात जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) * ३८१९७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांची संख्या इतर विभागाच्या तुलनेत जास्त असून त्या माध्यमिक शाळांमध्ये वर्ग-२ मुख्याध्यापकांची व शिक्षकांची जिल्हानिहाय एकूण मंजूर पदे किती आहेत, त्या मंजूर पदापैकी माहे डिसेंबर, २०१७ अखेर किती पदे रिक्त आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाडा विभागातील माध्यमिक शाळांसाठी सर्व भौतिक सोयीयुक्त टाईप प्लॅन करुन इमारत बांधण्यासाठी तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) मराठवाडा विभागामध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांची संख्या ३८१ आहे. माध्यमिक शाळेतील वर्ग-२ मुख्याध्यापकांची ३०४ पदे व शिक्षकांची १८६१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी मुख्याध्यापकांची ३०३ पदे व शिक्षकांची २१८ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) ९५ टक्के पेक्षा जास्त माध्यमिक शाळांना इमारत उपलब्ध आहेत. उर्वरित शाळांना जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन विकास समिती व सर्व शिक्षा अभियान यांच्या माध्यमातून इमारती उपलब्ध केल्या जातात.

मुख्याध्यापकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच राज्यातील खाजगीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व माध्यमाच्या शाळांमधील शिक्षण सेवक भरती ही अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे करण्याकरिता माहे डिसेंबर, २०१७ मध्ये सदर परीक्षा घेण्यात आलेली आहे. “पवित्र" या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सदर भरती प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदीची पावती सादर करण्याची सक्ती केल्याबाबत

**(१७) * ३८७६० ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना व अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना गणवेश देताना परिषदेने परिपत्रक काढून विद्यार्थ्यांना गणवेश देण्याऐवजी त्यांचे पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये जाहिर करुन त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत आई व विद्यार्थी यांचे संयुक्त खाते असणे बंधनकारक करण्यात आले असल्याने विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडिलांसोबत असलेल्या खात्यातही पैसा जमा करण्यात येतील परंतू त्यासाठी गणवेश खरेदीची पावती सादर करण्याची सक्ती करण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर करुन सुधारित परिपत्रक काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेत खाते उघडण्यासाठी करण्यात आलेले अर्ज तांत्रिक कारणाने बाद करण्यात आले असून, खात्यात किमान रक्कम ठेवल्यास ती वापरता येत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) शासनाच्या दिनांक ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थी विद्यार्थ्यांचे त्यांच्या आईच्या नावासह आधार संलग्न संयुक्त बँक खाते राष्ट्रीयकृत बँक/शेड्युल्ड बँक/ग्रामीण बँकामध्ये उघडण्याबाबतच्या सूचना

देण्यात आलेल्या आहेत. तथापि, याबाबत काही अडचणी उद्‌भवल्याने स्वत: लाभार्थी विद्यार्थी व आई यांच्या आधार संलग्न संयुक्त बँक खात्याचा आग्रह न धरता विद्यार्थी व आई किंवा वडील आणि आई-वडील नसल्यास लाभार्थ्यांचे अन्य पालकांच्या वैयक्तिक आधार संलग्न खात्यावर गणवेश लाभाची रक्कम वर्ग करण्याबाबत दिनांक १४/१२/२०१७ च्या पत्रानुसार सर्व क्षेत्रिय यंत्रणांना कळविण्यात आले आहे.

शासनाच्या दिनांक ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांने अगोदर गणवेशाची खरेदी करुन त्या खरेदीची पावती सादर केल्यानंतरच लाभाची रक्कम बँक खात्यात वर्ग करण्याची तरतूद आहे.

सदर योजनेंतर्गत एकूण पात्र ३७,६२,०२७ लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी २४,४०,३८९ विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्यात आली असून त्यापैकी १९,१७,८९० विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे. गणवेश खरेदीची पावती जमा न केलेल्या ५,२२,४९९ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अद्याप लाभाची रक्कम जमा झालेली नाही. एकूण लाभार्थ्यांपैकी उर्वरित १३,२१,६३८ लाभार्थी विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सद्य:स्थितीत बँक खाती नसलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यास्तव त्यांना चालू वर्षापुरती DBT योजनेमधून सुट दिली आहे.

विद्यार्थ्यांची बँक खाती शून्य रकमेवर (Zero Balance) वर उघडण्याबाबत आणि सदर खात्यावर कोणतेही शुल्क न आकारण्याबाबत बँकांना निर्देश देण्यात यावे आणि सर्व विद्यार्थ्यांची बँक खाती काढण्यास कालावधी मिळण्यासाठी या व पुढील शैक्षणिक वर्षासाठी सूट देण्यात यावी, अशी विनंती नियोजन आणि वित्त विभागास करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे संतपीठ स्थापन करण्याबाबत

**(१८) * ३७९७९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३३५ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संतपीठ कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने "संतपीठ योजना" हा विषय सांस्कृतिक कार्य विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली,

(३) तसेच पैठणप्रमाणे त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे संत निवृत्ती महाराजांची समाधी आणि शहराचे धार्मिक, पौराणिक, सांस्कृतिकदृष्टया असलेले महत्व पाहता त्र्यंबकेश्वर व राज्यात अन्यत्र संतपीठ स्थापन करण्यासंदर्भात शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) पैठण येथे संतपीठ स्थापन करण्याबाबत समिती गठीत करण्याची कार्यवाही विभागस्तरावर सुरु आहे.

(३) व (४) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तसेच राज्यात अन्यत्र संतपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## मौजे अलोंडे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील एस्टीम प्रा.लि. कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(१९) * ३८७६४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अलोंडे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील एस्टीम प्रा. लि. कारखान्यामधून इथिन ऑक्साईड वायू हवेत आणि विषारी पाणी नाल्यात सोडले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाल्याच्या पाण्यामुळे नाल्याच्या आजुबाजूच्या परिसरातील जनावरे व मासे मृत्यूमुखी पडत असल्याने लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, विक्रमगड यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रदूषण करणाऱ्या सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) व (२) प्रश्नाधिन विषयाबाबत नगरसेविका, नगर पंचायत, विक्रमगड यांचे निदेवन तहसिलदार विक्रमगड यांच्याकडे प्राप्त झाले, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, विक्रमगड व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीनुसार निवेदनामध्ये नमूद प्रश्नाधिन उद्योगामधून कोणताही वायू तसेच सांडपाणी उद्योगाच्या आवाराबाहेर सोडल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रावर इलेक्ट्रॉनिक वजन काटे उपलब्ध नसल्याबाबत

**(२०) * ३८२५८ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील आदिवासी बहुल गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विविध कार्यकारी सेवा संस्थेद्वारा सुरु केलेल्या धान खरेदी केंद्रावर इलेक्ट्रॉनिक वजन काटे नसल्याने शेतकऱ्यांची फसवणुक होत असून धानोरा तालुक्यात १० धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांचे प्रति क्विंटलमागे अंदाजे ६०० ग्राम नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वजन काटे त्वरित खरेदी करण्याच्या सूचना संबंधित विभागाने दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान खरेदी केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक वजन काटे उपलब्ध करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही/उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) नाही. हे खरे नाही.
(२) व (३) होय.

इलेक्ट्रॉनिक वजन काटे उपलब्ध करुन देण्याबाबत आदिवासी विकास महामंडळ आणि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून कृषी उत्पन्न बाजार समित्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (जि.रायगड) येथील कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२१) * ३९६१७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५८०८ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (जि.रायगड) येथील १२८ कंपन्या कोणतीही प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी सीईटीपी प्रकल्पात सोडत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सुमारे ९०० हेक्टर जमिनीवर पसरलेल्या व ४७ वर्षापूर्वी स्थापन झालेल्या तळोजा येथील औद्योगिक वसाहतीत सध्या प्रदूषण होत असून त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उपाययोजना होत नसल्यामुळे येथील अनेक मोठ्या उद्योगांनी गुजरात राज्यात स्थलांतरीत होण्याचा निर्णय घेतला असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिसराला मा.पर्यावरण मंत्री यांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास भेट देऊन पहाणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुसार तळोजा येथील प्रदूषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन याप्रकरणी किती कंपन्यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दोषी उद्योगांवर कारवाई करण्यात येते हे खरे आहे. तथापि, त्यामुळे उद्योग स्थलांतरीत होतात हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) दिनांक ०१/०१/२०१७ ते दिनांक २८/०२/२०१८ या कालावधीत एकूण १५३ कारखान्याविरूध्द कारवाई केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नवीन पाणीपुरवठा योजनांना मान्यता देण्याबाबत

**(२२) * ३९६९६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" या कार्यक्रमासाठी सन २०१७-१८ मध्ये रुपये ३०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली असून त्यामधून ५०० नवीन पाणीपुरवठा योजनांना मान्यता देण्याचे प्रस्तावित करण्यात आले तसेच त्यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ५०० नवीन पाणीपुरवठा योजनांपैकी किती पाणीपुरवठा योजनांना मान्यता देण्यात आली आहे, त्यासाठी किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे व त्यानुसार करावयाच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उर्वरित पाणीपुरवठा योजनांना मान्यता न देण्याची कारणे काय आहेत व सदर योजनांबाबत केव्हा कार्यवाही करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत दिनांक ०७ मे, २०१६ पासून नव्याने घ्यावयाच्या १००३ पाणीपुरवठा योजनांपैकी रुपये ११७७.५३ कोटी इतक्या किंमतीच्या ५२३ योजनांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच ११४ योजना अव्यवहार्य ठरविण्यात आल्या आहेत. उर्वरित ३६६ योजनांना मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

मंजूरी देण्यात आलेल्या ५२३ योजनांपैकी २३५ योजनांच्या कामांचे कार्यादेश देऊन कामे प्रगतीपथावर आहेत, २३८ योजनांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत व उर्वरित ५० योजनांच्या निविदा प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे. मंजूर योजनांच्या अंमलबजावणीकरिता एकूण रुपये ३३२.४३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्राहक संरक्षणाच्या कामाची पुनर्रचना करण्याबाबत

**(२३) * ४०१५८ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ग्राहकांची फसवणूक होत असल्याने विभागाला तक्रार दाखल करुनही तक्रारीचे निवारण होत नसल्याने यासंदर्भात स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने मागणी केल्याचे माहे डिसेंबर २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद गठीत करण्यात आली असून या परिषदेतील सदस्य, सचिव, जिल्हा पुरवठा अधिकारी यांना अन्न नागरी पुरवठ्याचे काम असल्याकारणाने ग्राहक संरक्षणासाठी वेळ देता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहक संरक्षणाच्या कामाची पुनर्रचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) हे खरे नाही. प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे कामकाज करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यात केरोसिनचे वाटप करण्याबाबत

**(२४) * ४०७३१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक स्वस्त धान्य दुकानात शासनाच्या दुर्लक्षामुळे लाभधारकांना त्यांच्या हक्काचे केरोसिन वाटप झाले नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अर्धापूर तालुक्यात केरोसिनचे वाटप करण्याबाबत तसेच सदर गैरप्रकार करणाऱ्या स्वस्त धान्य दुकानावर व या गैरप्रकाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

अर्धापूर तालुक्यास माहे जानेवारी, २०१८ मध्ये ४२ कि.ली. केरोसिन नियतन मंजूर करण्यात आले असून सदरचे केरोसिन लाभार्थ्यांना दिनांक १८ जानेवारी, २०१८ ते ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीत वाटप करण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माऊंट कार्मेल ॲकॅडमी स्कूल, मुंबई येथील शिक्षिकेविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२५) * ४०७६३ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माऊंट कार्मेल ॲकॅडमी स्कूल, मुंबई या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील के.जी. २ च्या वर्गातील एका ५ वर्षाच्या मुलीला वर्गात फळयावर दिलेले गृहपाठ पूर्ण न केल्यामुळे तिच्या शिक्षिकेने सदर मुलीचे केस पकडून तिला मारहाण केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व याप्रकरणी संबंधित शिक्षिकेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर येथील वालधुनी नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(२६) * ४०७७७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील वालधुनी नदी प्रदूषणास कारणीभूत ठरलेले जीन्स कारखाने मलंगगड पट्टयातील काही गावात सुरु करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारखाने मलंगगड भागात स्थलांतरीत झाले परंतू कारखान्यातील प्रदुषित पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता नदीत सोडत असल्याने या भागातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील नागरिकांच्या आरोग्यास धोका होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान मलंगगड परिसरात ५ जीन्स उद्योग अनधिकृतपणे सुरु असल्याचे व सदर जीन्स वॉशिंग प्रक्रियेमधून निर्माण होणारे सांडपाणी जमिनीत खड्यामध्ये साठविल्याचे आढळून आले होते.

तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार उल्हासनगर/मलंगगड पट्टयातील जीन्स वॉश उद्योगामुळे परिसरातील जनतेच्या आरोग्यास त्रास होत असल्याबाबतची तक्रार त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मलंगगड परिसरात अनधिकृतपणे सुरु असलेले ५ जीन्स वॉशिंग उद्योगांना दिनांक ०३ मार्च, २०१८ रोजी उद्योग बंद करण्याचे आदेश दिले असून, सद्य:स्थितीत सदर उद्योग बंद आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धान्य पुरवठा करणाऱ्या शासकीय गोदामांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२७) * ४०९२७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धान्य पुरवठा करणाऱ्या शासकीय गोदामांची दुरवस्था झाली असल्याने धान्य ठेवण्यासाठी प्रशासनाकडून शासकीय गोदामांऐवजी खाजगी गोदामांचा वापर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयात एकूण ५८ शासकीय गोदामे असून त्यापैकी २८ गोदामे चांगल्या स्थितीत असून ३० गोदामे मोडकळीस आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गोदामांच्या दुरूस्तीसाठी शासनाकडून पुरेसा निधी येत नसल्याने पावसाळयात धान्य सुरक्षित ठेवण्यासाठी गोदामाला प्लास्टिकचा आधार घ्यावा लागतो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्य सुरक्षित ठेवण्याच्यादृष्टीने शासकीय गोदामे सुस्थितीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) साठवणूक क्षमता कमी असणाऱ्या ठिकाणी केंद्र/राज्य शासन अंगीकृत व निमशासकीय संस्था यांचेकडे गोदाम उपलब्ध नसल्यास खाजगी गोदामे आवश्यकतेनुसार भाडयाने घेण्यात येतात.
(२) व (३) रायगड जिल्ह्यात एकूण ५७ शासकीय गोदामे आहेत. सदर गोदामांपैकी २७ गोदामे चांगल्या स्थितीत असून ३० गोदामे नादुरुस्त आहेत. सन २०१३-१४ पासून रायगड जिल्ह्यातील १९ गोदाम दुरुस्ती अंदाजपत्रकांना रुपये २.३५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

गोरेगाव ता.माणगाव, उरण व श्रीवर्धन येथील गोदामांना धान्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्लास्टिकचा आधार घ्यावा लागतो. यापैकी श्रीवर्धन येथील गोदाम बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निधी वितरीत करण्यात आला आहे. गोरेगाव ता.माणगाव व उरण येथील गोदाम दुरुस्ती अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात गोदाम दुरुस्ती कामासाठी रुपये ३.२४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

## हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळातील रोजंदारीवरील कामगारांना कामावर रुजू करण्याबाबत

**(२८) * ४१०६४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळात रोजंदारीवर काम करणारे ४२ कामगार मागील ६ वर्षापासून रोजगाराच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने या कामगारांच्या बाजूने निकाल दिल्यानंतरही प्रशासनाने त्यांना कामावर रुजू करुन घेतलेले नाही असा आरोप या कामगारांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामगारांना कामावर रुजू करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) व (२) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळामध्ये रोजंदारी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी मा.औद्योगिक न्यायालयामध्ये दाखल केलेल्या तक्रार अर्ज क्र.७६९/२००० बाबत मा.न्यायालयाने दिनांक २४/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार, भविष्यात महामंडळात जसे आणि जेव्हा काम उपलब्ध होईल त्यावेळी सदर रोजंदारी कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता यादीनुसार चक्राकार पध्दतीने काम देण्यात यावे, असे अंतिम आदेश दिले आहेत. तथापि, रोजंदारी कर्मचाऱ्यांना हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत आदेश मा.न्यायालयाने दिलेले नाहीत. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार, हाफकिन महामंडळातील उपलब्ध कामासाठी वरीष्ठता यादीप्रमाणे प्रथमत: ०५ रोजंदारी कर्मचाऱ्यांना रोजंदारी स्वरुपाचे काम देण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले होते. तथापि, तक्रारकर्त्याच्या वकिलांनी सर्व रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सामावून घेण्याची मागणी केली आहे. हाफकिन महामंडळाचा मंजूर पदांचा आकृतीबंध ७६८ पदांचा असल्याने सदर मागणी मान्य करता येत नाही. तसेच, संबंधित कर्मचाऱ्यांनी सन-२०१२ मध्ये मा.औद्योगिक न्यायालयामध्ये दाखल तक्रार क्र.३७४/२०१२ दाखल केली होती. मा.न्यायालयाने दिनांक २२/१०/२०१२ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये सदर तक्रार फेटाळली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील पाणीपुरवठा योजनांमध्ये अपहार झाल्याबाबत

**(२९) * ४१०६६ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील १३६ पाणीपुरवठा योजनांमध्ये अपहार झाल्याचे विभागीय बैठकीत दिलेल्या अहवालात नमूद करण्यात आले असून त्यामध्ये औरंगाबाद २३, परभणी ६०, नांदेड ६, उस्मानाबाद २, बीड ४४ व लातूर १ अशी जिल्हानिहाय स्थिती असून यामध्ये ११.१२ कोटीची रक्कमही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहाराच्या रकमेतील रूपये ७० लाख वसूल झाले असून अद्यापी ६९ प्रकरणाची चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यातील अपहार झालेल्या १३६ पाणीपुरवठयात दोषी असलेल्या सर्व संबंधितांविरोधात कारवाई करुन अपहाराची संपूर्ण रक्कम विनाविलंब वसूल होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

या १३६ पाणीपुरवठा योजनांमध्ये रुपये ११.६६ कोटी इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशतः खरे आहे.

अपहाराच्या रकमेतील रुपये ५१.७९ लक्ष रकमेची वसुली झालेली आहे. एफ.आय.आर. नोंदणी केलेल्या योजना ३१, न्यायप्रविष्ट योजना ४, आर.आर.सी. साठी कार्यवाही केलेल्या योजना ६ व एफ.आय.आर. नोंदणी बाकी असलेल्या योजना २७ अशा ६८ योजनांबाबत कार्यवाही चालू आहे.

(३) व (४) संबंधित ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडून प्रलंबित कामे करुन घेणे, पोलिसात गुन्हा नोंदविणे व आर.आर.सी. ची कार्यवाही करुन संबंधितांच्या ७/१२ वर बोजा चढविणे अशा प्रकारची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## राज्यात नियमबाह्यरित्या शिक्षकांची नेमणूक केल्याची चौकशी करण्याबाबत

**(३०) * ४११३३ श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५५२९ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित शाळांमध्ये ४ हजार ११ शिक्षकांना नियमबाह्यपणे देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येईल असे शासनाने विधानसभेत जाहीर करुनही त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाहय पध्दतीने मान्यता देवून रुपये ९७ कोटींचे नुकसान करणाऱ्या संस्थाचालक तसेच अधिकाऱ्यांवर शासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना नियमबाह्यरित्या देण्यात आलेल्या मान्यता रद्द करण्याबाबत कार्यवाही करुन सदरील संस्थाचालक व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील हंगामी निवासी वसतिगृहांच्या प्रस्तावाला मान्यता मिळण्याबाबत

**(३१) * ४११५६ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी भागातल्या मुलांसाठी हंगामी निवासी वसतिगृहांच्या प्रस्तावाला शासनाकडून मान्यता मिळण्याबाबतचे निवेदन समर्थन संस्थेने मा.आदिवासी विकास मंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री आणि प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) डहाणू तालुक्यातील ४ व जव्हार तालुक्यातील २ हंगामी वसतिगृहांच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. सद्य:स्थितीत सदर हंगामी वसतिगृहे सुरु आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चौधरवाडी (पो.सर्कलवाडी) (ता.कोरेगांव, जि.सातारा) गावात नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३२) * ४०२८१ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौधरवाडी (पो.सर्कलवाडी) (ता.कोरेगांव, जि.सातारा) गावात उन्हाळ्यात २ ते ३ दिवसांतून एकदा १० ते १५ मिनिट पाणी येत असून नियमित पाणीपुरवठा देखील कमी दिवस व कमी वेळ येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अनियमित पाणीपुरवठ्यामुळे येथील ग्रामस्थांसाठी व जनावरांसाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नियमित व अधिक वेळ पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

चौधरवाडी गावाच्या उत्तर दिशेस विहिरीतून १.५० ते २.०० लाख लिटर इतका पुरेसा पाण्याचा साठा आहे, त्यामधून सदर गावास शुध्द व पुरेसे पाणी वितरीत करण्यात येते, तथापि विद्युत पुरवठ्यात काही व्यत्यय येत असल्याने पाणी पुरवठ्यावर त्याचा परिणाम होतो. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळाकडे मागणी केली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा फुले मागासवर्गीय उच्च प्राथमिक शाळा, गुलशन नगर, नागपूर शहरात बोगस कागदपत्रांच्या आधारे स्थलांतरित झाल्याबाबत

**(३३) * ३८११४ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले मागासवर्गीय उच्च प्राथमिक शाळा, गुलशन नगर (नागपूर) ही शाळा शासनाची परवानगी नसताना काटोल येथून नागपूर शहरात बोगस कागदपत्र सादर करुन स्थलांतरित झाली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१०-११ व २०११-१२ पासून सदरहू शाळेत पुरेशी पटसंख्या नसताना व पटसंख्येच्या आधारावर दोनच शिक्षक पदे मान्य असताना तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथ.), नागपूर यांनी दिनांक ०१ जानेवारी, २०१० पासून १५ शिक्षक/शिक्षण सेवक, १ लिपीक, १ शिपाई अशा १७ पदांना मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेबद्दल तक्रारी केल्यानंतरही व शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांना गैरकारभाराची संपूर्ण माहिती असतानासुध्दा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी दिनांक ११ जुलै, २०१७ ला १५ शिक्षकांचे वेतन अनुदान काढण्याचे आदेश देऊन शासनाची फसवणूक केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शाळेतील गैरव्यवहाराबाबत व वेतन अनुदान अपहाराबाबत शाळेची विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१७ रोजी शासनास पत्र पाठवून केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) महात्मा फुले मागासवर्गीय उच्च प्राथमिक शाळा बोगस कागदपत्रांच्या आधारे स्थलांतरित झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्याबाबत चौकशी करण्यात आली असून अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच सदर शाळेच्या स्थलांतराचे आदेशांची सत्यता पडताळणी करून मिळणेबाबत शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी विनंती केली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर शाळेच्या वेळोवेळी करण्यात आलेल्या संच मान्यतेनुसार २०१३ मध्ये २०१० पासून १० शिक्षक व १ लिपिक, १ शिपाई पदांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच तद्नंतर देण्यात आलेल्या संच मान्यता व पदमान्यतेनुसार आजरोजी १५ शिक्षक कार्यरत आहेत.

(३) हे खरे नाही.

संबंधित शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन यु-डायस अभावी स्थलांतरानंतर बंद झाले होते. तथापि कर्मचाऱ्यांचे वेतन बंद करण्याबाबत आदेश नसल्याने यु-डायस क्रमांक प्राप्त झाल्यावर दिनांक ११/०७/२०१७ रोजी शिक्षकांचे वेतन अनुदान काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) व (५) मा.श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१७ रोजी अशी मागणी केली आहे. संबंधित संस्थेच्या स्थलांतराबाबत पडताळणी करण्यात येत असून त्याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात दारिद्रय रेषेखालील, अंत्योदय योजनेतील शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरीत करण्याबाबत

**(३४) * ४००८० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात दारिद्रय रेषेखालील, अंत्योदय योजनेतील १ ते २ व्यक्ती असलेल्या कुटुंबाच्या शिधापत्रिका अंत्योदय मधून प्राधान्य यादीत समाविष्ट करण्यात आल्याने व केशरी शिधापत्रिकामधील ७० टक्के लाभधारक कुटुंबे जीवनावश्यक रास्त धान्य पुरवठा व इतर जीवनावश्यक वस्तूंपासून वंचित राहत असल्याबाबत समर्थन या संस्थेने मा.मंत्री अन्न व नागरी पुरवठा, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा व अध्यक्ष, राज्य ग्राहक संरक्षण यंत्रणा यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या योग्य नियोजनाअभावी अंत्योदय योजनेतील ९७,०८५ व केशरी शिधापत्रिकाधारकांमधील ७० टक्के कुटुंबांचा समावेश प्राधान्य यादीत करण्यात आल्याने रास्त धान्य पत्रिकाधारकांना त्यांचे हक्काचे असलेले धान्य वितरीत करण्याबाबत व गावपातळीवर तसेच आदिवासी भागात अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार जीवनावश्यक रास्त धान्य पुरवठा व इतर जीवनावश्यक वस्तूंपासून लाभार्थ्यांना वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.
(२) पात्र व त्याच लाभार्थ्याला अन्नधान्याचे वितरण व्हावे म्हणून PoS द्वारे शिधापत्रिकाधारकांची बायोमेट्रीक ओळख पटवून अन्नधान्याचे वितरण केले जात आहे.
(३) राज्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधार सिडींगचे काम सुरु आहे. त्या आधार सिडींगनुसार इष्टांक बदलाची कार्यवाही सुरु असून, कोणताही पात्र व योग्य लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. लाभार्थ्यांना वंचित ठेवले जात नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राध्यापकांच्या वेतनाबाबत

**(३५) * ३७९०३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राध्यापकांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ ते १० मे, २०१३ या कालावधीतील सर्व प्रकारच्या परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बहिष्कार विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करण्यात आली असून या याचिकेवर सुनावणी होऊन एमफुक्टो संघटनेबरोबर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमून सर्व प्रकारचे प्रश्न ७१ दिवसांच्या वेतनासह सोडवावेत असा निकाल मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्राध्यापकांना सदर कालावधीतील वेतन देण्याबाबत मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० मार्च, २०१६ रोजी समिती स्थापन करुन निर्णय घेण्याचे मान्य करण्यात आले तसेच सदर प्राध्यापकांना बहिष्कार कालावधीतील वेतन मिळण्याबाबत विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीच्या एमफुक्टो संघटनेबरोबर किती बैठका झाल्या आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परीक्षा बहिष्कार कालावधीतील ७१ दिवसांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये दिनांक १० मे, २०१३ रोजी शिक्षक व शिक्षक संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनस्तरावर तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. राज्यस्तरावर

अशा प्रकारची तक्रार निवारण समिती गठीत करण्यात यावी व समितीच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षक संघटनेच्या मागण्या/समस्या/तक्रारी इ. सखोल विचार करून त्यावर निर्णय घ्यावा असे आदेश दिले.

(३), (४) व (५) याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १० मे, २०१३ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून दिनांक २५ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयान्वये शासनस्तरावर राज्यस्तरीय तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची बैठक दिनांक २५ सप्टेंबर, २०१३ व दिनांक ०९ जानेवारी, २०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. तथापि, एमफुक्टो संघटनेस सदर समितीची रचना मान्य नसल्याच्या कारणास्तव संघटनेचे कोणतेही प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहीले नाहीत. तद्नंतर दिनांक १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये उक्त समितीची पुनर्रचना करून विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. दिनांक १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत विशेष समितीच्या बैठकी घेण्यात येऊन या प्रकरणी निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात फ्लोराईडयुक्त जलस्त्रोत आढळल्याबाबत

**(३६) * ३८२७७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३०८९९ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील पंचायत समिती क्षेत्रातील ७८५० गावांमध्ये फ्लोराईड मिश्रित जलस्त्रोत असल्याचे सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने मोबाईल अॅपद्वारे केलेल्या तपासणीत आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फ्लोराईडयुक्त पाणी प्याल्याने घाटंजी तालुक्यातील खैरगांव, आर्णी, वणी, उमरखेड तालुक्यातील लिंगनुर, पांढरकवडा तालुक्यातील खैरगांव येथील ग्रामस्थांना किडनी आजार, हाडांचे व दातांचे विकार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार यवतमाळ जिल्हा फ्लोराईड मिश्रित जलस्त्रोतमुक्त करण्याच्यादृष्टीने तसेच फ्लोराईड मिश्रित पाणी प्याल्याने बाधित झालेल्या ग्रामस्थांना रोगमुक्त करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

यवतमाळ जिल्ह्यात एकूण १८३२ गावे असून त्यामध्ये ८५३७ पिण्याच्या पाण्याचे उद्‌भव आहेत. मान्सूनपूर्व रासायनिक तपासणी अभियान २०१७-१८ अंतर्गत ७४२१ उद्‌भवांची रासायनिक तपासणी करण्यात आली. त्यामध्ये २७३ गावांमधील ४९३ पिण्याच्या पाण्याच्या उद्‌भवांत १.५ पी.पी.एम. पेक्षा जास्त फ्लोराईड आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सदर जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये २७३ गावांमधील ४९३ फ्लोराईड बाधित उद्‌भव पिण्याच्या वापरासाठी बंद करण्याच्या सूचना संबंधित ग्रामपंचायतीना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच सदर २७३ गावांमध्ये १०९० हातपंप, ६३२ विहिरी, ७५ पॉवरपंप, १९४ नळयोजना या पर्यायी उद्‌भवांद्‌वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग शाळांतील कंत्राटी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(३७) * ३८९५४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग शाळातील कंत्राटी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सेवेत कायम करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५/०८/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार विशेष शिक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती समाप्त करण्याबाबत पारित केलेले आदेश रद्द करण्यात येत असल्याचे शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना दिनांक ०५/०१/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

-----------------

## जळगाव येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(३८) * ४०४७३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इतर मागासवर्गीय समाजाप्रमाणे मराठा समाजाला सवलती देण्याचा निर्णय दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी जाहीर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये त्याचे पालन होत नसल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासकीय आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या महाविद्यालयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुख्याध्यापकाच्या नियंत्रणातील तुकड्यांना माध्यमनिहाय संचमान्यता देण्याबाबत

**(३९) * ३८८१२ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगर परिषद, जिल्हा परिषद व खाजगी संस्थेमध्ये एकाच मुख्याध्यापकाच्या नियंत्रणातील तुकड्यांना माध्यमनिहाय संचमान्यता देण्याविषयी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे अमरावती विभाग शिक्षक आघाडीने दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माध्यमनिहाय संचमान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) अमरावती विभाग शिक्षक आघाडीचे दिनांक ०६/०२/२०१५ चे निवेदन आढळून येत नाही. तथापि सन २०१६-१७ च्या संचमान्यता माध्यमनिहाय करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण येथील लेखाधिकारी कार्यालय अलिबाग येथे स्थलांतरीत करण्याबाबत

**(४०) * ४०८७४ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना वेतन मिळण्यासाठी आवश्यक असलेले पे-युनिट गेले १० ते १२ वर्षांपासून अलिबाग येथे असल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची देयके मंजूर करण्यासाठी पेण येथील लेखाधिकारी कार्यालयात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महिन्याचे वेतन वेळेत मिळत नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त लेखाधिकारी कार्यालय, पेण येथून अलिबाग येथे आणावे अशी मागणी शिक्षणाधिकारी, रायगड व उपसंचालक, शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) लेखाधिकारी (शिक्षण), पेण, जिल्हा रायगड हे कार्यालय अलिबाग येथे स्थलांतरीत करण्याच्यादृष्टीने जागेचा शोध सुरु असून पुरेशी जागा उपलब्ध झाल्यावर सदर कार्यालय अलिबाग येथे स्थलांतरीत करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यात इयत्ता अकरावीच्या परीक्षा पध्दतीत बदल केल्याबाबत

**(४१) * ३८८४६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय पातळीवरच्या परीक्षा देताना मागील वर्षी (सन २०१६-१७) राज्यातील सुमारे साडेचार लाख विद्यार्थ्यांपैकी अवघ्या २८ हजार विद्यार्थ्यांना ५० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळविण्यात यश मिळाले असून, भविष्यात राष्ट्रीय पातळीवरील सहामाही परीक्षा सक्तीच्या करण्यात आल्या तर राज्यातील विद्यार्थ्यांना त्या देणे सोपे व्हावे या उद्देशाने शासनाने इयत्ता अकरावीच्या परीक्षा पध्दतीत बदल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे बदल विद्यार्थ्यांना समजले नसल्याने यावर्षी (सन २०१७-१८) विविध महाविद्यालयामध्ये जाहिर झालेल्या सहामाही परीक्षांच्या निकालात सुमारे ४० टक्के विद्यार्थी नापास झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या अध्यक्षांनी उक्त परीक्षा पध्दतीचा परिणाम अकरावीच्या निकालावर होत असून, परीक्षा पध्दतीतील बदलामुळे या वर्षीच्या शैक्षणिक वर्षात अकरावीचा निकाल कमी लागेल, तर सर्व परीक्षांची तुलना नीट व जेईईशी करु नये, तसे झाल्यास विद्यार्थी मुख्य प्रवाहातून बाहेर पडतील व १७ क्रमांकाचा अर्ज भरुन १२ वी ची परीक्षा देतील, या बाबींकडे शासनाचे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आडगांव (जि.नाशिक) येथील नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील बांधकामाबाबत

**(४२) * ३८०४१ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२०३ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगांव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील प्रशासकीय इमारत बांधकामासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निवड केलेल्या कंत्राटदारास इमारत बांधकाम कार्यादेश देण्याबाबतची सुरु असलेली अंतिम टप्प्यातील कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील इमारतीच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कार्यादेश देण्यासंबंधीची कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे** : (१), (२), (३) व (४) बांधकामास नाशिक महानगरपालिकेकडून परवानगी प्राप्त झालेली आहे. सदर जागेवरील अतिक्रमण हटविल्यानंतर कंत्राटदारास कार्यादेश देण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(४३) * ३८९८८ श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२१२ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील नगरपंचायतीच्या लोकसंख्येचा विचार करता स्वतंत्र नगरपंचायतीसाठी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शासनाकडून टंचाईग्रस्त गाव-पाडयांची संख्या कमी करण्यासाठी प्राधान्याने सीएसआर फंडातून बेरीस्ते गाव आणि पाच पाड्यांसाठी पाणीपुरवठा योजना मंजुर करुन काम सुरु करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामाची मुदत संपुन जवळ-जवळ सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेले नाही, तसेच सदर पाणीपुरवठा योजनेच्या कामास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधीत पाणीपुरवठयाची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोखाडा तालुका पाणी टंचाई/टँकर मुक्त करण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच मोखाडावासियांना मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा केव्हापर्यंत होण्याचे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पुराच्या पाण्यामुळे आजुबाजूची माती विहिरीत पडल्यामुळे विद्युत पंप गाडला गेला होता. सततच्या पावसामुळे विहिरीचे काम बंद होते. सद्य:स्थितीत विहिरीचे काम पूर्ण होऊन चाचणी तत्वावर एका पाड्यास पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) मोखाडा नगरपंचायत क्षेत्राकरीता नवीन पाणीपुरवठा योजना करण्याच्यादृष्टीने सर्वेक्षण करण्यात येत आहे.

मोखाडा तालुका पाणी टंचाईमुक्त करण्याच्यादृष्टीने १५ विहिरींची कामे व ५ लघु नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत ९ कामांच्या आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत एका कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून एका कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. जलयुक्त शिवार अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर झालेल्या ४ कामांपैकी ३ कामे पूर्ण झाली असून एक काम प्रगतीपथावर आहे. जलयुक्त शिवार सन २०१७-१८ मध्ये एकूण ११ कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेवर कारवाई करण्याबाबत

**(४४) * ४०००० श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, वनसडी (जि.चंद्रपूर) संस्थेद्वारा संचालित व्यायामशाळेच्या बांधकामाच्या बनावट कागदपत्रांवर रुपये २ लक्ष अनुदानाचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, वनसडी संस्थेच्या संस्थाचालकाविरुध्द जिल्हा क्रीडा विभागाने वसुलीची नोटीसही सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय युवा धोरण सन २०१३-१४ अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यासह चंद्रपूर जिल्हा व राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या निधीच्या बनावट कागदपत्रांचे वाटप झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, वनसडी संस्थेसह अन्य संस्थांवर वसुलीची नोटीस देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचा सर्वसाधारण तपशील काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) तत्कालीन क्रीडा अधिकारी यांचेविरुध्द एसीबी मार्फत गुन्हा क्र. ३०५२/२०१४ कलम ७, १२, १३(१)(ड) सह कलम १३(२) लाच प्रतिबंधक कायदा, १९८८ अन्वये दाखल करण्यात आला आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी सदर संस्थांच्या व्यायामशाळेची तपासणी/पाहणी केली असता संस्थांनी व्यायामशाळेचे बांधकाम केलेले आढळून न आल्यामुळे तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ वनसडी या संस्थेस दिनांक २६/१२/२०१७ व श्रीराम शिक्षण संस्था, पिपर्डा, ता.कोरपना, संत रामराव महाराज, सेवादासनगर, ता.जिवती, अभिषेक ग्रामविकास संस्था, पिटीगुडा, ता.जिवती, स्वातंत्र्यवीर सावरकर शिक्षण प्रसारक मंडळ, भोयगांव, ता.कोरपना या संस्थांना दिनांक २०/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी १८% व्याजाने अनुदानाची रक्कम शासनास चलनाद्वारे भरण्याकरिता नोटीस देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य हागणदारी मुक्त करण्याबाबत

**(४५) * ३९६९७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक २८६०७ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण महाराष्ट्र राज्य हागणदारी मुक्त करण्याचे नियोजन माहे मार्च, २०१८ पर्यंत करण्यात आले असून सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात राज्य आणि जिल्हास्तरावरील योजनांमध्ये एकूण रुपये ५४५ कोटी ६६ लाख इतकी तरतूद करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तरतुदीतून किती रकमेचा विनियोग करण्यात आला व त्यातून कोणती कामे हाती घेण्यात आली तसेच माहे जानेवारी, २०१८ पर्यंत यापैकी किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, उर्वरित निधीचा विनियोग किती कालावधीत करण्यात येणार व त्यातून करावयाच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील संपूर्ण ग्रामीण भाग मार्च, २०१८ पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकूण रुपये ७४७ कोटी २६ लाख इतकी तरतूद राज्य हिश्श्यांतर्गत करण्यात आलेली आहे.
(२) उक्त तरतूदीपैकी फेब्रुवारी, २०१८ अखेर रुपये ५९० कोटी ८६ लाख इतक्या निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत मुख्यत्वेकरून वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम हाती घेण्यात आलेले आहेत. तसेच माहे जानेवारी, २०१८ पर्यंत १८ लाख ४५ हजार ८२५ इतक्या वैयक्तिक शौचालयांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.
(३) उर्वरित निधीचा विनियोग मार्च, २०१८ अखेर पर्यंत करण्यात येणार आहे. दिनांक १ एप्रिल, २०१७ ते दिनांक ०८ मार्च, २०१८ अखेर पर्यंत संपूर्ण राज्यामध्ये २१ लाख ०३ हजार ४८९ इतक्या वैयक्तिक शौचालयांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठी साहित्य मंडळाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(४६) * ४०१६६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०८५ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या मराठी भाषा विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या साहित्य संस्कृती मंडळाकडून मराठीत प्रसिध्द होणाऱ्या आणि साहित्य भाषा यांच्या प्रसारात हातभार लावणाऱ्या नियतकालिकांना वार्षिक अनुदान दिले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कागद व इतर वस्तूंचे वाढलेले दर पाहता हे अनुदान तुटपुंजे असल्याने त्यातून एका आवृत्तीचा खर्चही निघत नसून अनुदान प्राप्त नियतकालिकांच्या व्यवस्थापकांना पत्र पाठवून साहित्य संस्कृती मंडळाची प्रकाशन योजनांची माहिती देणारी जाहिरात वर्षभरात प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक अंकात विनामूल्य छापणे बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान प्राप्त नियतकालिकांच्या अनुदानात शासन वाढ करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठी साहित्य मंडळाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची माहिती जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने मंडळाने सदर जाहिरात नियतकालिकांमध्ये छापण्याची विनंती केली होती.

(३) अनुदान प्राप्त नियतकालिकांच्या अनुदानात दिनांक १५ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली आहे.

(४) शासन निर्णय क्रमांक-सापअ-१०१५/प्र.क्र.१४७/२०१५/भाषा.३, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७ याअन्वये अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या ७ साहित्य संस्थांच्या वार्षिक अनुदानात प्रत्येकी रूपये ५ लाखावरून रूपये १० लाख अशी वाढ करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांना संरक्षक भिंत बांधण्याबाबत

**(४७) * ४०९९७ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळेभोवती संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यासाठी केंद्र शासनाने मान्यता नाकारल्याने राज्यातील ६२१९४ शाळांपैकी १४०९८ शाळांना संरक्षक भिंती नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रम शाळा संहितेनुसार राज्यातील कार्यरत ५०६ शासकीय आश्रम शाळांपैकी १४६ आश्रम शाळांना संरक्षण भिंत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने शाळांना संरक्षक भिंती बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. सन २०१७-१८ च्या यु-डायस डेटानुसार राज्यामध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक ६६५१५ शाळांपैकी ५१०७१ शाळांना संरक्षक भिंत उपलब्ध असून १५४४४ शाळांना संरक्षक भिंत उपलब्ध नाही.

(२) अंशत: खरे आहे. राज्यातील ४३४ आश्रमशाळांपैकी २७७ आश्रमशाळांना संरक्षक भिंत असून १५७ आश्रमशाळांना संरक्षक भिंत नाही.

(३) ज्या शाळांमध्ये पक्की संरक्षक भिंत नाही, तेथे तारेचे कुंपण, डिडोनिया/ मेहंदी यासारख्या वनस्पतींचे कुंपण घालण्याबाबत शासन निर्णय, दिनांक २९/०६/२०१३ अन्वये आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## असल्फा घाटकोपर, मुंबई येथील अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४८) * ४०७८२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असल्फा घाटकोपर, मुंबई येथे अनधिकृत कारखाने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले असून या अनधिकृत कारखान्याच्या धुरामुळे स्थानिक नागरिकांना श्वसनाचे आजार होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येवूनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कारखान्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून कारवाई करण्यात येत आहे.

असल्फा घाटकोपर, मुंबई येथील अनधिकृत कारखान्यांवर कलम ३९० व ३९४ अन्वये एकूण २४४ कारखानेधारकावर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २४ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत व ०३ उद्योगाना प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काळाचौकी, मुंबई येथील मे.कैलास फार्मा औषध दुकानावर कारवाई करण्याबाबत

**(४९) * ४०९७८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळाचौकी, मुंबई येथील एका औषध विक्रेत्याकडून बनावट औषधांचा साठा अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) मार्फत जप्त करण्यात आला असून तेथे बनावट औषधांची खरेदी-विक्री करण्यात येत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे.मेयर ऑरगॅनिक प्रा.लि. या उत्पादकाने त्यांच्या कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५०० या औषधाचा खप कमी झाल्याने त्याच नावाच्या बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याची शंका व्यक्त केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार काळाचौकी येथील मे.कैलास फार्मा औषध दुकानात या बनावट औषधांचा साठा जप्त करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५०० या औषधाची बनावट विक्री थांबविण्याबाबत कार्यवाही करुन मे.कैलास फार्मा औषध दुकानावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) मे. मेयर ओरगॅनिक प्रा.लि. या उत्पादकाने त्यांच्या “कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५००” या नावाच्या बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याची शंका अन्न व औषध प्रशासनाकडे व्यक्त केली होती. याबाबत प्रशासनाने बाजारातून प्राथमिक माहिती घेतली. सदर माहितीच्या आधारे मे.कैलास फार्मा, काळाचौकी या संस्थेच्या जागेवर धाड टाकली असता सदर ठिकाणी कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५००, समूह क्रमांक २५८ एसजे ६२७२ या औषधांचा साठा आढळून आला. मे.मेअर ऑर्गनिक या उत्पादकाचे कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५०० व उपलब्ध कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५०० च्या लेबलिंग व पॅकिंगमध्ये बारीक सारीक तफावत आढळून आली. सदर साठा बनावट असल्याच्या संशयावरुन चौकशी केली असता, सदर साठा मे.मेयर ऑरगॅनिक या कंपनीचा नसून इतर पुरवठादारांकडून प्राप्त केल्याचे आढळून आले. सदर साठ्यातून चाचणीस्तव नमुना घेऊन उर्वरीत रुपये ६६,०३३/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. चाचणीस्तव घेतलेल्या नमुन्यांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

सदर प्रकरणी पेढीचे भागीदार, पुरवठादार व इतर संबंधित अज्ञात व्यक्तीविरुध्द काळाचौकी पोलीस ठाणे, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील स्वस्त धान्य दुकानात तांदळाचा काळाबाजार झाल्याबाबत

**(५०) * ४१०७० श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजना, अंत्योदय योजना व शेतकऱ्यांसाठी दरमहा वितरीत होणाऱ्या पाच टन तांदळाचा काळाबाजार झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक दिवसापासून स्वस्त धान्य दुकानामध्ये प्रत्येक ५० किलोच्या पोत्यात दोन-तीन किलो गहु, तांदूळ कमी येत असल्याच्या तक्रारी स्वस्त धान्य दुकानदाराकडून येत असून याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) वैजापूर तालुक्यातील सहा शिधावाटप दुकानदारांनी नायब तहसिलदार (पुरवठा), वैजापूर यांना समक्ष भेटून धान्य कमी मिळत असल्याबाबत तोंडी तक्रार केली होती. त्यास अनुसरुन तहसिलदार यांनी गोदामपाल यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविला व शिधावाटप दुकानदारांच्या समक्ष गोदामातील धान्याचे मोजमाप केले असता, धान्य बरोबर आढळले. प्रकरणी संबंधित दुकानदारांनी लेखी अर्ज देऊन तक्रार मागे घेतली आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## "डॉक्टर विदाऊट बॉर्डर" या कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(५१) * ४०३९८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परदेशात निर्यात करणाऱ्या “डॉक्टर विदाऊट बॉर्डर” या कंपनीवर छापा टाकून क्षयरोग, एड्स आदि आजारांवरील रुपये २० लाख ५० हजार इतक्या रक्कमेच्या औषधांचा साठा अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास जप्त केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) या प्रकरणी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन झाले आहे. सबब, सदर कायद्यांतर्गत तपास पूर्ण करुन न्यायालयात खटला दाखल करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी पोलिसांकडे प्रथम खबर नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी अटक करण्यात आलेली नाही.

(३) दिनांक ०८/०९/२०१७ रोजी विश्लेषणासाठी घेतलेल्या ०३ नमुन्यांपैकी ०२ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. सदर ०२ नमुने प्रमाणित दर्जाचे आढळून आले असून ०१ प्रकरणी अहवाल प्रलंबित आहे. प्रलंबित अहवाल प्राप्त करण्यासाठी पाठपूरावा सुरु आहे.

-----------------

## नागपूर येथील शासकीय चित्रकला महाविद्यालयातील अधिष्ठात्यांची चौकशी करण्याबाबत

**(५२) * ३८१५७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय चित्रकला महाविद्यालयातील प्राध्यापकांनी अधिष्ठात्यांच्या गैरवर्तणुकीबाबत कला संचालनायाकडे अनेकवेळा तक्रारी केल्या परंतु त्यांच्या तक्रारींवर कोणतीही कारवाई न झाल्याने महाविद्यालयातील प्राध्यापकांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजीपासून काम बंद आंदोलन सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आंदोलनापुर्वी या महाविद्यालयातील अधिष्ठात्यांच्या गैरवर्तणुकीबाबत तसेच त्यांची नियुक्ती बोगस असल्याचे व त्यांच्या प्राध्यापक पदास मान्यता नसल्याबाबत प्राध्यापकांनी कला संचालनालयाकडे एकूण १३ तक्रारी पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी निवेदन पाठवून आंदोलनाची दखल घेण्याबाबत व प्राध्यापकांना उचित न्याय देण्याबाबत कार्यवाही करण्याची विनंती केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर या महाविद्यालयातील अध्यापकांनी दिनांक १७/११/२०१७ च्या पत्राद्वारे कला संचालनालयास लेखणीबंद आंदोलन करीत असल्याचे कळविले होते.

(२) होय.

(३) होय.

(४) प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने दिनांक ११/१२/२०१७ च्या आदेशानुसार संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कुरंगवणे खैराटवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(५३) * ४००८१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुरंगवणे खैराटवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील नळ पाणीपुरवठा योजनेसाठी एकूण रुपये एक कोटी त्र्याहत्तर लाख खर्च तसेच ग्रामस्थांनी श्रमदान करुनही सदर योजना बंद पडल्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण झाल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मौजे कुरंगवणे खैराटवाडी येथील नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मौजे कुरंगवणे खैराटवाडी नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीजवळ पुरेशा दाबाने विद्युत पुरवठा होत नसल्याने योजनेचा पंप नादुरुस्त झाला होता. नादुरुस्त झालेला पंप जानेवारी, २०१८ अखेर दुरुस्त करुन योजना पुन्हा कार्यान्वित करण्यात आली आहे. परंतु पुरेसा विद्युत दाब उपलब्ध नसल्याने सदर योजना बंद ठेवण्यात आली आहे.

योजनेच्याजवळ रोहित्र (Transformer) मंजूर असून सद्य:स्थितीत रोहित्र उपलब्ध नसल्याने ते बसविण्यात आलेले नाही. रोहित्र तातडीने बसविण्याबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कणकवली यांना लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक विहिरीद्वारे पाणी उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी संस्थांच्या शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांना वेतन देण्याबाबत

**(५४) * ३७८९९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी संस्थांच्या शाळेतील शिक्षक हे विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले असून सदर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी राज्य शासनाने ऑनलाईन पध्दतीने समायोजन करण्याचा प्रयत्न केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही खाजगी संस्थांकडून या शिक्षकांचे समायोजन करुन घेतले जात नसल्याने सर्व शाळातील शिक्षकांचे वेतन दोन ते तीन महिन्यापासून शिक्षणाधिकारी यांनी प्रलंबित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी संस्थेतील शिक्षक भरती किंवा समायोजन करण्याचे अधिकार मुख्याध्यापक व शिक्षक यांना नसून खाजगी संस्थाना आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळेतील सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांचे वेतन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे ज्या शाळेत समायोजन केले आहे ती शाळा सदर शिक्षकांस रुजू करुन घेण्यास तयार नसेल तर अशा शिक्षकांचे वेतन मूळ शाळेतून अदा करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहावीच्या भाषा विषयांच्या परीक्षेचे २० गुण शिक्षण मंडळाने रद्द केल्याबाबत

**(५५) * ३८९६० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहावीच्या भाषा विषयांच्या परीक्षांमधील २० गुण राज्य शिक्षण मंडळाने रद्द केले आहेत तर सीबीएसई आणि आयसीएसई परीक्षेने याच गुणांना अधिक प्राधान्य दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असून पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये याबाबत तसेच पालक आणि विद्यार्थ्यांमधील असंतोष दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शिक्षक सेवकांचा कालावधी पूर्ण केलेल्या शिक्षकांना नियमित करण्याबाबत

**(५६) * ४०६०५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक सेवकांना ३ वर्षाच्या कालावधीनंतर सेवेत कायम करण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सुमारे २९ शिक्षकसेवकांचा ३ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन त्यांना नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे मागील ६ महिन्यांपासून मंजुरीस्तव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर तालुक्यातील २९ शिक्षकसेवकांना नियमित करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) शिक्षण सेवक या पदावर तीन शैक्षणिक वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराला प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणी देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २००३ रोजी पारित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१४ मध्ये शिक्षण सेवक म्हणून हजर झालेल्या ४५ शिक्षकांपैकी ४३ शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी देण्यात आलेली असून, २ शिक्षकांस नियमित वेतनश्रेणी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील सर्व तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(५७) * ३९५३५ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३३२ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ३८० तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून उर्वरित १४३ तालुका क्रीडा संकुलाची समिती गठीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रयोजनाकरिता १४३ पैकी १०८ तालुका क्रीडा संकुलास जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित तालुका क्रीडा संकुल समिती गठीत करणे व जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरील कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) कार्यवाही सुरु आहे.
(२), (३) व (४) राज्यात एकूण ३८० तालुका क्रीडा संकुलांपैकी ३२१ तालुका क्रीडा संकुल समित्या गठीत करण्यात आलेल्या असून ३८० संकुलांपैकी ७७ क्रीडा संकुलांचे बांधकाम पूर्ण, ५८ क्रीडा संकुलांचे बांधकाम अंतिम टप्प्यात व ८५ क्रीडा संकुलांचे बांधकाम प्रगती पथावर आहे. तसेच १०२ क्रीडा

संकुलांना जागा उपलब्ध झालेली नसून जागा शोधण्याची/प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. संबंधित आमदार तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा संकुल यांचे संमतीने समितीची बैठक आयोजन करण्याबाबत सुचित केले जाते.

-----------------

## गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संशोधन संस्थेस निधी उपलब्ध करण्याबाबत

**(५८) * ३९७०३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेस निधी उपलब्ध करण्यात आलेला नसल्यामुळे संस्थेचे कामकाज सुरळीतपणे होत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या संस्थेसाठी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून सव्वा वर्ष झाल्यानंतरही संस्थेस देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संस्था शासनाने स्थापन केलेली असतानाही संस्थेस शासनाकडून निधी उपलब्ध न करण्याची कारणे तसेच संस्था स्थापन करण्याचा उद्देश काय आहे व त्याद्वारे कोणते उपक्रम राबविण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संस्थेस निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ च्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्‌यापीठामध्ये गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) सदर संस्था स्थापन करण्याचा उद्देश महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची शैक्षणिक व आर्थिक उन्नती होण्यासाठी ग्रामीण भागात संशोधन व शैक्षणिक कार्यक्रम राबवून शेती व शेतीपूरक व्यवसायास तंत्रज्ञानाच्या आधारे प्रोत्साहन देणे व आदर्श खेडी तयार करणे हा आहे. सदर संस्थेद्‌वारे १) Rural Development and Research, २) Rural Economics, Banking and Industry, ३) Conservation of Biodiversity व ४) Rural Technology हे ४ विभाग पहिल्या टप्प्यात सुरु करण्यात येणार आहेत. मा.मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता दिल्याप्रमाणे मा.अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार सदर संस्थेसाठी प्रतिवर्षी रुपये ३ कोटी असे ३ वर्षात रुपये ९ कोटी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृष्णा नदी (सांगली) येथील पाण्याचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(५९) * ४१००१ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्‌या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगलीची जीवनदायी असलेल्या कृष्णा नदीतील पाण्याचे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी उपप्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाने मागील सहा वर्षापासून सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेसह जिल्ह्यातील विविध प्रकल्प, महानगरपालिका, नगरपालिकांना ११६ नोटीसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोटीसांची दखल घेऊन त्यानुसार अंमलबजावणी न करणाऱ्या प्रकल्प, महानगरपालिका व नगरपालिकांची एकूण संख्या व नावे काय आहेत तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीसानुसार कारवाई न करणाऱ्यांविरुध्द नोटीसा पाठविण्याव्यतिरिक्त कोणती कारवाई केली,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृष्णा नदी (सांगली) येथील पाण्याचे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाठविलेल्या नोटीसांच्या अनुषंगाने सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने अंशत: पूर्तता केलेली असून सांगली जिल्ह्यातील तासगांव नगरपालिका, विटा नगरपालिका, इस्लामपूर नगरपालिका, आष्टा नगरपालिका व जत नगरपालिका या ५ नगरपालिकांनी सदर नोटीसांची पूर्तता केलेली नाही. तसेच सदर नोटीशीची पूर्तता न करणाऱ्या १२ उदयोगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बंदचे आदेश पारीत केले होते त्यानुषंगाने सदर उद्योगांनी पूर्तता केली असून त्यापैकी ३ उद्योग सद्य:स्थितीत बंद आहेत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली यांचे कोर्टात पर्यावरण संरक्षण कायदयांतर्गत फौजदारी खटला क्र. ३००१२३/२०१५ दाखल केलेला असून सदर प्रकरणी मा.न्यायालयाकडून स्टे (जैसे थे) देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील नागरिकांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(६०) * ४१०७९ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना गॅस्ट्रो तसेच इतर विविध साथीची लागण होवून त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कार्यवाही करुन दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ६२५१ पाणी नमुन्यांची जैविक तपासणी करण्यात आली त्यापैकी ४९२३ नमूने योग्य व १३२८ नमूने पिण्यास अयोग्य आढळून आले आहेत.

जैविकरित्या अयोग्य आढळलेल्या पाणी उद्‌भवांबाबत ब्लिचिंग पावडरचा वापर व नियमितपणे ओ.टी. टेस्ट करण्याच्या ग्रामपंचायतींना तसेच संबंधित गटविकास अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.